MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Journal | June 2019 Special Issue | 01

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318 ™

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक शोध पत्रिका

# विद्यावार्ता ™

Editor

**Prof. Dr. Bharati Revadkar**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.

At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com

All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

90

# Vidyawarta™

## International Multilingual Research Journal

Special Issue

Edited By :- Prof. Dr. Bharati Revadkar

ISSN :- 2319 9318

- Publisher :
  Harshwardhan Publication Pvt.Ltd.
  Limbaganesh, Dist. Beed (Maharashtra)
  Pin-431126, vidyawarta@gmail.com

- Printed by :
  Harshwardhan Publication Pvt.Ltd.
  Limbaganesh, Dist. Beed, Pin-431126
  www.vidyawarta.com

- Page design & Cover :
  Shaikh Jahuroddin,Parli-V

- Edition: June 2019

Indexed

IMPACT 6.021 IIJIF FACTOR

Cosmos IMPACT FACTOR 5.234

Govt. of India, Trade Marks Registry Regd. No. 2611690

Note : The Views expressed in the published articles,Research Papers etc. are their writers own. 'Printing Area' dose not take any libility regarding appoval/disapproval by any university, institute,academic body and others. The agreement of the Editor, Editorial Board or Publicaton is not necessary. Disputes, If any shall be decided by the court at Beed (Maharashtra, India)

http://www.printingarea.blogspot.com

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal
June 2019
Special Issue


## CONTENTS


| Sr. No. | Title/Author | Page No. |
|---|---|---|
| 1. | गौरी देशपांडेंचे लेखन : एक चिंतन<br>**प्रा. डॉ. भारती रेवडकर** | 6 |
| 2. | आदिवासी स्त्री लेखिकांचे साहित्य<br>**प्रा. डॉ. माहेश्वरी गावित** | 10 |
| 3. | स्त्री विकासाचा पाया स्त्री शिक्षण<br>**प्रा. पोर्णिमा शिरीश कोल्हे** | 16 |
| 4. | परंपराधिष्ठित नव स्त्रीजीवन शैलीचा 'मारवा'<br>**डॉ. सुवर्णा गुंड - चव्हाण** | 19 |
| 5. | महिला सक्षमीकरणाच्या दिशा<br>**डॉ. नवनाथ दणाणे** | 25 |
| 6. | बहिणाबाईंच्या कवितेतील स्त्री जीवनाचा उत्कट आविष्कार<br>**डॉ. विशाल प्रकाश लिंगायत** | 27 |
| 7. | "स्त्रीवाद प्ररणा, स्वरुप व संकल्पना आणि मराठीतील स्त्रीवादी साहित्य"<br>**डॉ. बाळासाहेब दास** | 30 |
| 8. | वैदिक कालखंडातील स्त्री जीवन<br>**प्रा. शुभदा शिवपूजे-उपासे** | 36 |
| 9. | स्त्रीवादी संकल्पना आणि स्वरुप<br>**प्रा. डॉ. सुनिता सुर्यवंशी** | 38 |
| 10. | भारतीय राजकारणातील स्त्री-प्रतिनीधीत्व<br>**प्रा. बावगे एस. जे.** | 41 |


www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318
Vidyawarta® Peer-Reviewed International Journal
June 2019 Special Issue
027

हीन असे स्थान देण्यास सांगते. स्त्रियांना दुय्यम स्थान देण्यास सांगते. स्त्रीयांना गुलाम बनविण्यास सांगतो. त्या मनुस्मृतीचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर दहण करतात. तो दिवस ही स्त्री मुक्ती दिन म्हणून आपण साजरा करु शकतो.

अशा प्राकरे महिला सक्षमीकरणाच्या दिशेने आपण एक पाऊल टाकू शकतो.

❑❑❑

06

# बहिणाबाईच्या कवितेतील स्त्री जीवनाचा उत्कट आविष्कार

**डॉ. विशाल प्रकाश लिंगायत**
सहायक प्राध्यापक, मराठी विभाग,
श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालय, बार्शी,

**प्रा. श्रीमती वरडे के.एस्.**
सहायक प्राध्यापिका, अर्थशास्त्र विभाग,
(बी.पी.सुलाखे कॉमर्स कॉलेज, बार्शी)

***********

**प्रस्तावना :—** एकोणीसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि विसाव्या शतकात सुध्दा स्त्रियांची स्थिती फारच बिकट अशी होती. स्त्रियांना सामाजिक जीवनात तर स्थान नव्हतेच, पण कौटुबिक जीवनातही ती स्वतंत्र नव्हती. कुटुंब हा समाजाचा सर्वात लहान घटक असतो. स्त्री ही कुटुंबातील सर्व व्यक्तींशी विविध नात्यांनी जोडलेली असते. त्यानुसार तिची कर्तव्ये व अधिकार ठरत असतात. घराची चौकट आणि अगदीच झाले तर शेत अशा दोन टप्प्यांत स्त्रियांचे जीवन बांधले गेले होते. अशावेळी माहेरची आठवण, सासरच्यांचे वर्तन आणि वाटयाला आलेले इतर अनुभव व्यक्त करण्याकरीता स्त्रियांकडे एकच पर्याय उपलब्ध होता तो म्हणजे काव्याचा. वर्षभरातील सण, उत्सव, समारंभ याप्रसंगी एकत्र येऊन परपस्परांशी साधला जाणारा संवाद हाच काय तो स्त्रियांच्या जीवनातील विरंगुळा होता. हर्ष, खेद, राग, लोभ, चीड, संताप, उद्रेक अशा भावना व्यक्त करण्याचे उत्तम माध्यम म्हणजे काव्य. हेच माध्यम बहिणाबाईंनीही निवडले. त्यामुळेच मराठी काव्याला स्त्रियांच्या समृध्द स्त्रीगीतांची आणि ओव्यांची परंपरा लाभली. बहिणाबाईंनी आपल्या काव्यातून ग्रामीण जीवनातील शेतकरी वर्गाच्या वैविध्यपूर्ण भावभावना अस्सखलितपणे मांडल्या आहेत. बहिणाबाईंना

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318 | Vidyawarta® Peer-Reviewed International Journal | June 2019 Special Issue | 029

पोटातून येत ओठी''[४]

घरातील आणि शेतातील कामे करता करता बहिणाबाईंना काव्य सुचले आणि ते काव्य मराठी कवितेच्या प्रांगणात अजरामर झाले.

मराठी साहित्यात लोकगीतांची परंपरा फार जूनी आहे. पण त्यातही स्त्रीगीतांची आणि ओव्यांची परंपरा नुसती जुनीच नाही तर अनुभवांनी समृध्द आहे. बहिणाबाई निरक्षर होत्या, त्यांनी कधी शाळाही बघितली नव्हती. परंतु तरी त्या अडाणी नव्हत्या त्या असे म्हणत की, 'ही काळी शेतातील माती आणि रामाचं देऊळ हीच माझी शाळा''. जे शहाणपण तथाकथित शाळांमध्ये आज मिळत नाही, ते या कवयित्रीने सहजपणे साध्या शब्दात जनमाणसात रूजवलं. आपल्या कवितेतून बहिणाबाई सहजपणे सांगतात की, कविता यायला किंवा आयुष्य जगायला जगाची शाळा पुरेशी आहे. फक्त माणसाने त्यांच्याकडे डोळे उघडून बघायला हवे. त्या प्रांजळपणे कबूल करतात की माझे कवित्व ही त्या माता सरस्वतीची देणगी आहे. तिने निसर्गातच इतकी गुपिते आणि ज्ञान पेरून ठेवलं आहे की, ते माझ्या मनातून उमलता उमलता मला आपोआप शिकायला मिळालं.बहिणाबाईच्या कवितेतून स्त्री जीवनाचा समृध्द ठेवा बघावयास मिळतो. स्त्री मग ती कुठलीही असो, तिला माहेराची ओढ सदैव लागलेली असते. हीच माहेराबद्दलची ओढ आपणास बहिणाबाईच्या अनेक कवितांतून बघावयास मिळते, त्यातील 'हिरीताचं देणं' या कवितेतून त्या म्हणतात,

'उभे शेतामध्ये पीक,
ऊन वारा खात खात
तरसती कधी जाऊ
देव भुकेल्या पोटात''[५]

किंवा

''लागे पायाला चटके, रस्ता तापीसनी लाल
माझ्या माहेराची वाट, माले वाटे मखमल''

परंतु माहेरचे कौतुक करताना सासरविषयी त्यांना मात्र तिटकारा नाही, बहिणाबाईच्या काव्यातून माहेरचे वर्णन जितके आणि जसे येते तितक्याच वेळा त्याच सहजतेने त्या सासरचे, माणसांचे वर्णन करतात.

''खटल्याच्या घरांमधी, देखा सग्गी सासू,
सदा पोटामधी माया तसे डोयामधी आसूं''[६]

अशाप्रकारे सासर—माहेर हया दोन विषयांपुरतेच त्यांनी स्वत:ला बांधून घेतलेले नाही. त्यापेक्षा कितीतरी अधिक विषय आपल्याला बहिणाबाईच्या काव्यातून जाणवतात.एक दिवस शेतात राबराब राबणाऱ्या, कष्ट करणाऱ्या शेतकरी बायकांनी बहिणाबाईंना प्रश्न विचारला की, तुम्ही तर आमच्या सारखचं शेतात काम करता? मग तुम्हाला एवढं कसं सुचतं? यावर त्या आपल्या 'माझी माय सरसोती' या कवितेत म्हणतात,

''माझी माय सरसोती, माले शिकविते बोली
लेक बहिनाच्या मनी, किती गुपितं पेरली !
माझ्यासाठी पांडुरंगा, तुझं गीता भागवत
पावसात सामावतं, माटीमधी उगवतं.......
तुझ्या पायाची चाहूल लागे पानापानामधी
देवा तुझं येनंजानं, वारा सांगे कानामधी''[७]

माझी मायच सरस्वती माता आहे. तीच मला हे सर्व सांगते, शिकविते. कारण मी तिची लेकच असल्यामुळे ती आपल्या लेकीला सर्व सांगते. माझ्यासाठी प्रत्यक्ष पांडुरंगचं गीता—भागवत पावसाच्या रूपाने पाठवतो व ज्ञान मला मातीतून जे उगवतं त्या रूपात मिळत असतं, असे बहिणाबाई सांगतात.

मराठी साहित्यात विशेषत: काव्याच्या प्रांतात ज्या काही मोजक्या स्त्री साहित्यिकांनी दर्जेदार साहित्य निर्मिती केली आहे. त्यापैकीच एक असणाऱ्या बहिणाबाई म्हणजे जणू अस्सल मोत्यांचा वा हिऱ्यांचा हांडा सापडावा तसं अस्सल बावनकशी सोनं आहे. 'बहिणाबाईच्या कविता म्हणजे त्यांनी घेतलेले श्वासनि:श्वास आहेत. त्यामुळे त्यांच्या कवितांचा जिवंतपणा थोडाही कमी झालेला नाही.''[८] निरक्षर व अशिक्षित असूनही जे काव्यामृत त्यांनी निर्माण केले आहे त्याला खरोखरच तोड नाही.

बहिणाबाईच्या या दृष्टीत सांस्कृतिक ऐश्वर्य आढळते. बहिणाबाईची कविता म्हणजे निसर्ग, शेती, स्त्री—जीवन, आत्मविषयक जाणीव, अध्यात्म, बोध प्रद काव्य, उपदेशात्मक काव्यरचना, जीवनविषयक तत्वज्ञान, माणसाच्या मनाचे सूक्ष्म अवलोकन इ. गुणविशेषांनी युक्त अशी कविता आहे ही खऱ्या अर्थाने स्त्री जीवनाचा उत्कट आविष्कार व्यक्त करणारी कविता म्हणून समृध्द ठरते याबद्दल कोणालाही शंका नाही.